# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३६३९/२०२३

**अपिलार्थी, श्री.सरोजकुमार मिश्रा**
ब्लॉक नं.ए-७७, रुम नं.४६०,
अनमोल पॅलेसच्या बाजुला, उल्हासनगर,
जि.ठाणे ४२१ ००१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता निरीक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, उल्हासनगर, महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०५.२०२३ | --- | १७.०७.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १६.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *"PIO not providing information. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.एकनाथ उदयसिंग पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सार्वजनिक आरोग्य विभाग, उल्हासनगर महागनरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" Information required under RTI act, 2005 on action taken on my complaint letter dated 24.04.2023 vide token number 4120233333300007612 copy sent to you is enclosed with this RTI application on action taken on officials responsible for lapse for not lifting the Garbage and not removing waste materials/debris which is lying there since October 2020 and due to this gutter/drainage is choked up.*

1) *Provide the date on which my above complaint letter was received by The Addittional Commissioner Karuna Juhikar Madam=*
2) *Provide certified copies of all registers on which entry of letter is entered by each & every department.*
3) *Provide me remark is put up on letter and action taken by the Additional Commissioner.*
4) *Provide the name of (i) Department & name of (ii) officer/office in charge to which my complaint letter was forwarded by the Additional Commissioner.*
5) *Provide me action taken by officer to which letter forwarded by the Additional Commissioner.*
6) *Provide the names of officials responsible for the lapse of lifting the garbage/waste materials.*
7) *Provide the action taken on them for their lapse.*
8) *Provide me Present status of the Complaint and date by which it will be resolved.*
9) *Name/Designation/Address of First appellate authority in this regard. "*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, सदरची माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित नाही. त्यामुळे मुळ अर्जच आपल्या विभागात प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाचे अवलोकन केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी, अति.आयुक्त कार्यालय, व प्रथम अपिलीय प्राधिकारी अति.आयुक्त कार्यालय अशा दोन अधिकारी यांना पक्षकार म्हणून दर्शविले आहे. तथापि या प्रकरणी सुनावणीची नोटीस ही घनकचरा विभागाच्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना काढण्यात आलेली आहे. आयोगाच्या कार्यालयाने योग्य त्या जन माहिती अधिकारी यांना पुढील सुनावणीची नोटीस काढणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. सदर प्रकरणी आयोगाच्या कार्यालयाने योग्य त्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सुनावणीची नोटीस काढावी.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
महाराष्ट्र राज्य माहिती आयोगा, कोकण खंडपीठ,
कोकण भवन, ५ वा मजला, रुम नं.५२७ व ५२८,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.